Impact Factor-8.575 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Referred Indexed

Multidisciplinary International Research Journal

( CCCXLIV ) 344 -H

## WOMEN IN INDIA AND ABROAD



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Baliram Pawar
Head, Department of Sociology
Mahatma Phule College Kingaon Latur
Maharashtra .413523

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Impact Factor - 8.575 ISSN - 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Referred Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## March-2022

ISSUE No- (CCCXLIV) 344- H

# WOMEN IN INDIA AND ABROAD

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. Baliram Pawar**
Editor
Head, Department of Sociology
Mahatma Phule College Kingaon , Latur Maharashtra .413523

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

# INDEX



| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | An Overview Of Bharatiya Mahila Bank (Bmb) Women Bank In India **Anandan K** | 1 |
| 2 | Participation Of Women In Indian Politics **H.M.Krishna** | 4 |
| 3 | Life and Works of TheAssamese Polymath Srimanta Sankardeva **Hridoy Ranjan Borah** | 8 |
| 4 | The Value of Philosophy in determining the ideals of education Nabajyoti Das | 12 |
| 5 | Women's Role in the Indian National Movement **Jolly Suresh Sonkar** | 14 |
| 6 | Title - Festivals Of Karbi- Tribe **Taz Uddin Choudhury** | 18 |
| 7 | Introduction of Environmental Accounting Course in Colleges and Universities **Ramesh L** | 21 |
| 8 | Concept of State and Government: A Philosophical Appraisal **Mouchumi Hazarika** | 26 |
| 9 | Preserving Digital Information **Mr. Sadashiv B. Warvate** | 32 |
| 10 | The God of Small Things: Pocolonial Issues in Indian Family **Dr. Prabhakar Shivraj Swami** | 35 |
| 11 | Women Empowerment and Use of Contraceptive – A Review **Nabaneeta Dutta** | 38 |
| 12 | Ecological Concerns In Saint Akkamahadevi's Vachanas **Poornima.P.S.** | 40 |
| 13 | Liberty, Equality and Justice in Political and Social Philosophy **Antaripa Chutia** | 44 |
| 14 | Changing Image of Indian Women: A Study **Shashikant S. Shende** | 48 |
| 15 | घरेलू हिंसा एवं कानूनी संरक्षण अनिता सोनी | 51 |
| 16 | प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया प्रा. पूजा हिरामण गांगोडे | 56 |
| 17 | महिलाओं के मौलिक अधिकार सुश्री ज्योति जाटव | 59 |
| 18 | अभिमन्यु अनत के त्रिखंडी उपन्यास (लाल पसीना, गाँधी जी बोले थे, और पसीना बहता रहा) में गिरमिटिया जीवन जयन्ती | 64 |
| 19 | भारतीय समाजातील स्त्रियांचा विभिन्न कालखंडातील दर्जा डॉ.प्रवीण मानसिंग कांबळे | 68 |
| 20 | विशाखा समिती व लैंगिक छळाचे प्रतिबंधन डॉ. अंजली जोशी- टेंभुर्णीकर | 73 |
| 21 | भारतरत्न इंदिरा गांधी राजकीय प्रवास प्रा. डॉ. संगीता पाठराबे | 78 |

# प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया

प्रा. पूजा हिरामण गांगोडे
महाविद्यालयाचे नाव : म.वि.प्र. कला आणि वाणिज्य महाविद्यालय, वणीता. दिंडोरी जि. नाशिक
(समाजशास्त्र विभाग), मो.न. ९५२७००३५१३, ८६०५१२४८२७, Email : poojagangode1996@gmail.com

प्रसारमाध्यमे आणि स्त्रिया

गोषवारा :

भारतीय संविधानाच्या रुपाने भारत देशात जगातील सर्वात मोठी लोकशाही व्यवस्था आली. विविधतेतून राष्ट्रीय एकात्मतेकडे प्रवास करणाऱ्या या लोकशाहीत मानवाला केंद्रस्थानी ठेवल्यामुळेच, विकसित राष्ट्रांच्या या शर्यतीत आपण उभे आहोत. या लोकशाही व्यवस्थेचे चार आधारस्तंभ हे शासन, प्रशासन, न्यायलयीन व्यवस्था व यामध्ये सर्वात महत्वाची भूमिका असणारा स्तंभ म्हणजे प्रसारमाध्यमे होय.

हा 'प्रसारमाध्यम' नावाचा चौथा आधारस्तंभ त्यांच्या तीन स्तंभावर लक्ष ठेऊन 'Common Man'व लोकशाही व्यवस्थेमध्ये 'पारदर्शकता' आणण्याचे काम करतात. वर्तमानपत्रे, न्यूज चेनल्स, सोशल मिडिया, ऑडीओ व्हीजवल्स हे प्रसारमाध्यमांचे काही प्रकार आपल्याला माहितच आहेत. तसेच हिंदी व इतर सर्व भाषेत प्रदर्शित होणारे सिनेमे, टी.व्ही सिरीअल्स, माहितीपट, आणि अश्लील चित्रपट असे प्रकार देखील समाजात घडणाऱ्या नकारात्मक आणि सकारात्मक घटनांना कॅमेरयात कैद करून समाजाच्या प्रत्येक मनाचा ठाव घेतात. यातील काही घटना मन सुन्न करतात. म्हणजेच प्रसारमाध्यमे हि समाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक सद्यस्थिती आणि 'Common Man' यात संवाद घडवतात.

आज संपूर्ण जगात चाललेल्या भारतीय अर्थव्यवस्थेत आज माहिती आणि प्रसारमाध्यमाना अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. १९९१ साली आलेल्या नवीन आर्थिक धोरणाने भारतातील परंपरावादी असणाऱ्या समाजामध्ये स्त्रियांना सर्व क्षेत्रात स्थान निर्माण करण्यास वाव दिला आहे. त्यामुळेच केवळ बातम्यांचे कथन करणारी स्त्री आज, व्यवस्थेला प्रश्न विचारू शकते. तसेच 'Private Sector' मध्ये आज स्त्रिया काम करताना दिसतात. तसेचआज अनेक क्षेत्रामध्ये स्त्री आपली भूमिका बजावताना दिसते.

**Keywords-** Women Empowerment, Social Media & Women, Social Struggle, Gender And Sexuality Studies, Gender And Development.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत संशोधन अभ्यासाकरिता 'निरीक्षण संशोधन पद्धतीचा' वापर केला आहे. तथ्य संकलनासाठी द्वितीय स्त्रोतांचा प्रामुख्याने वापर केला आहे. प्रस्तुत संशोधनाकरिता प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्यांचा उपयोग केला आहे. यामध्ये संदर्भ ग्रंथ, वर्तमान पत्रे, शासकीय कार्यालयीन माहिती, ग्रामपंचायत मधून मिळवण्यात आलेली माहिती, साप्ताहिके, मासिके, वार्षिक अंक, इंटरनेट, इ. चा समावेश आहे.

**उद्दिष्टे -**

१. प्रसारमाध्यमामध्ये स्त्रियांची भूमिका स्पष्ट करा.
२.प्रसारमाध्यमे आणि स्त्रीयांच्या शोषणाची कारणे स्पष्ट करा.
३.प्रसारमाध्यमे आणि स्त्रियांच्या हिंसाचाराचे स्वरूप आणि उपाययोजना स्पष्ट करणे.

**महिलांना निम्नस्तरातील दाखवण्यामागे पुढील कारणे आहेत.**

**१. महिलांचे प्रसार माध्यमातील सादरीकरण :**

आज 'माहेरची साडी' आणि 'हळदी कुंकू' या प्रतिमा पुसल्या जाऊन आता दंगल, मेरीकोम, उडान या सारख्या चित्रपटामधून स्त्रीला सक्षम दाखवण्यात येत आहे. पण दुसऱ्या बाजूला याच पुरुषसत्ताक समाजात पुरुषी मानसिकतेतून स्त्रीची प्रतिमा केवळ 'Sex Symbol' म्हणून ठेवण्याचा प्रयत्न काही भांडवलवादी मिडिया करताना दिसून येत. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विविध घटना आणि बलात्कार हा याच डावाचा भाग आहे. या भांडवलवादी प्रसारमाध्यमानी केवळ भांडवलदारांच्या कंपनीच्या जाहिरातीसाठी स्त्रियांचा वापर केला. बऱ्याचदा यामध्ये 'स्त्री' बीभत्स दाखवले जाते. 'आयटम सॉंग' च्या नावाखाली अनेकदा स्त्री चुकीच्या पद्धतीने प्रस्तुत केले जाते. या गाण्यांमध्ये अनेकदा अश्लील शब्दांना प्रोत्साहन दिले जाते. आज विविध टी. व्ही. माध्यमांमध्ये 'स्त्री विरुद्ध स्त्री' असे पात्र दाखवण्यात येतात. यामध्ये स्त्रीला टीपीकल, पारंपारिक प्रतिमेत अडकवले जाते. गोऱ्या रंगाच्या स्त्रिया या सुंदर

आणि सावळ्या रंगाला चुकीचे दाखवले जाते. स्त्रीया संदर्भात काळा-गोरा भेद, लठ्ठ-बारीक, शिकलेली-अडाणी अशा अनेक कारणांनी स्त्रियांमध्ये भेदभाव दाखवला जातो.

२. महिला सक्षमीकरण :

आजच्या युगात महिलांना सक्षम होऊन स्वतःच्या पायावर उभे राहणे अत्यंत गरजेचे आहे. माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करून आजच्या युगात वावरण्यास स्वतःला खंबीर केले पाहिजे.
लिंगभावद्वारे स्त्रियांची समाजात दिसणारी प्रवृत्ती स्त्रियांनी आपल्या कर्तुत्वाने पुसली पाहिजे. आज अनेक महिलांना माहिती तंत्रज्ञानाची पुरेशी माहिती नसल्यामुळे अनेक महिलांना या क्षेत्रात हवी तशी कामगिरी करता येत नाही. महिलांनी प्रसारमाध्यमांचा उपयोग करून आजच्या जगात स्वतःची वेगळी अशी ओळख निर्माण केली पाहिजे.

शासनाने विविध कार्यक्रम राबवून समाजात असणाऱ्या लिंगभावाचे प्रमाण कमी करावे. विविध चित्रपट अभिनेते, समाजकार्यात सक्रीय असणाऱ्या व्यक्तींनी या सर्वासाठी आपले योगदान देऊन महिला सक्षमीकरणासाठी आपले योगदान द्यावे.

३. शासनाची भूमिका

• प्रसारमाध्यमामध्ये महिलांचे शिक्षण आणि प्रशिक्षण आणि महत्वाचे म्हणजे रोजगार यासाठी शासनांनी विविध कार्यक्रम आणि योजना राबवणे गरजेचे आहे.
• स्त्रिया आणि प्रसारमाध्यमे या विषयासंबंधी विविध पैलूवर अभ्यास करून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात यावा.
• स्त्री आणि पुरुष यांना समान पातळीवर रोजगार निर्मिती हि करण्यात यावी.
• प्रसारमाध्यमामध्ये महिलांनी, महिलांकरिता विविध कार्यक्रमांचे सादरीकरण करावे. ज्याने इतर स्त्रिया देखील प्रोत्साहित होतील.
• प्रसारमाध्यमामध्ये काम करणाऱ्या महिलांना विशेष पाठबळ त्यांना काम करण्यास खंबीर करावे. ज्यामुळे इतर स्त्रिया देखील प्रोत्साहित होतील.

**४. स्वयंसेवी संघटनाची भूमिका :**

• आज महिलांच्या समस्या जगासमोर मांडणे अत्यंत गरजेचे झाले आहे. त्यामुळे स्वयंसेवी संघटनाची भूमिका अत्यंत गरजेची ठरते. सामान्य महिलांच्या गरजा आणि आवश्यकता या समाजासमोर मांडणे हे अत्यंत गरजेचे आहे.
• महिलांना माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करता येणे आजच्या युगात अत्यंत महत्वाचे झाले आहे. त्यामुळे त्यांचे प्रशिक्षण कार्यक्रम राबवने हे अत्यंत महत्वाचे आहे यासाठी स्वयंसेवी संघटनानी प्रयत्ने करणे गरजेचे ठरते.
• त्याचप्रमाणे स्वयंसेवी संघटना विविधउपक्रम राबवून महिलांच्या मानवी अधिकारांवर समाजात प्रबोधन घडवु शकतात.

अशी अनेक प्रकराची कारणे हि आज संपूर्ण स्त्री वर्गाला मागासलेली ठेवण्यास कारणीभूत आहेत. आज समाजातील अनेक स्त्रीया वरील आणि अशा प्रकारच्या विविध कारणामुळे समाजातमागासलेल्या राहतात. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर शोधणे गरजेचे आहे.

खर म्हटले तर मिडिया हा 'बायस' असता कामा नये. पण केवळ अभिजन व भांडवलशाही वर्गातील स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांच्या व बलात्काराच्या बातम्यांवर प्रकाश टाकणाऱ्या मिडीयाला 'अभिव्यक्ती स्वातंत्र्य' याबद्दल बोलण्याचा अधिकार राहत नाही. कारण आज अनेक आदिवासी, दलित, मजूर अशा महिलांवर अमानवी अत्याचार होत आहे. पण त्यावर चर्चा करायला कोणालाही वेळ नाही. मग त्यांना मिळणारा न्याय हा 'सिविल सोसायटीच्या' जागृत मेंदूच्या पडद्याआड होताना दिसून येतो.

आणि यामुळेच अनेक स्त्रीवादी संघटना लोककलेच्या माध्यमातून, पथनाट्य, गाणी, विद्रोही गीत गाऊन या अन्यायाला वाचा फोडण्याचे काम करीत आहेत. लोकमाध्यमाचे काम लक्षात घेऊनच अनेक स्वयंसेवी संस्थांनी 'Community Radio & Community Video'संकल्पना पुढे आणली. लोकमाध्यमांचा वापर हा प्रस्थापित असणाऱ्या भांडवलशाही मिडीयाला दिलेले हे चोख प्रत्युत्तर आहे.

आज प्रसारमाध्यमातून जर सामाजिक जाणिवेची मूल्ये जनसामान्यात रुजवली गेली तरच या देशात सामाजिक लोकशाही प्रस्थापित होण्यास मदत होईल. अन्यथा प्रसारमाध्यमांचा स्वत : पुरता वापर करून या देशात हुकुमशाही यायला वेळ लागणार नाही. महिलांचा सामाजिक आणि राजकीय स्तर उंचावण्यासाठी आणि त्यांच्या पंखात बळ निर्माण करण्यासाठी प्रसारमाध्यमे महत्वाची भूमिका बजाऊ शकतात. 'Sex'आणि 'Gender'हि संकल्पना स्पष्ट करून खऱ्या अर्थाने भारतीय संविधानातील असणारी मूल्य जोपासली जाणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा

लोकशाहीचा हा चौथा स्तंभ, इतर स्तंभांना घेऊन पडायला वेळ लागणार नाही. कारण आज पर्यंत 'महिला' आणि 'माध्यमाशिवाय' या जगात कोणतीच क्रांती शक्य झालेली नाही.

निष्कर्ष :

१. स्त्रियांच्या शोषणाबाबत प्रशिक्षण आणि कार्यशाळा आयोजित कराव्या लागतात. त्यांची प्रतिबंधात्मक अंबलबजावणी दिसून येत नाही.

२. स्त्रीयाच्या अत्याचाराचे विविध प्रकार दिसतात. परिणामी व्यक्ती, कुटुंब समाज या तिन्ही घटकांवर त्यांचा परिणाम होतो.

३. स्त्रियांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून स्त्री दबावगटाची निर्मिती विशाखा कृती समिती, समुपदेशन केंद्र, विविध कृती समिती या नावाचा गट स्थापन करावा.

४. दक्षता समिती, समुपदेशन केंद्र, विविध सखी मंच, परिवर्तन मेळावे, न्यायालयीन स्त्री न्यायाधीशाची भूमिका प्रामाणिक असावा.

५. राष्ट्र सुरक्षेसारखेच स्त्री सुरक्षेला महत्व असावे.

संदर्भसूची :

१. मानव संसाधन मंत्रालय, महिला व बाल कल्याण विभाग.
२. नारी शोषण समस्या एवं समाधान, डॉ. राजकुमार अर्जुन पब्लिकेशन हाउस, नवी दिल्ली, २०१३.
३. आधुनिक राजनीतिक निबंध, डॉ. जी. पी. नेमा, डॉ. गोपाळ प्रसाद, डॉ. श्रीमती राजेश जैन, विश्वभारती पब्लिकेशन, नवी दिल्ली.
४. महिला एवं विकास, डॉ. राजकुमार
५. Women Empowerment And Gender Planning, Ashine Roy, Rajat Publication, New Delhi, 2003.
६.Woman Empowerment, R.L Panigarhy, DarsathiBhuyan, Discovery Publication, New Delhi, 2006.